# 3.पर्यटन: संकल्पना व वर्गीकरण

## प्रास्ताविक

'पर्यटन' या व्यवसायाला आधुनिक काळामध्ये अतिशय महत्त्व प्राप्त झालेले अ जेव्हा पर्यटन करतो त्या वेळी पर्यटक विविध ठिकाणांना भेटी देत असतो, पर्यटन स्थळांन पर्यटकांचा भेट देण्याचा उद्देश, प्रवासाचा कालावधी, पर्यटकांची संख्या या आध पर्यटकांचे आणि पर्यटनाचे विविध प्रकार होताना दिसतात.

'पर्यटन' या विषयात विविध संकल्पना आधुनिक काळामध्ये रूढ झाल्याचे विसर येतात. यामध्ये भू-पर्यटन, कृषी पर्यटन, वारसा पर्यटन, साहसी किंवा धाडसी पयंस धार्मिक पर्यटन, आरोग्य पर्यटन, क्रीडा पर्यटन, आपत्ती पर्यटन या संकल्पना पर्यटन क्षेत्र विकसित होऊ लागल्या आहेत.

## पर्यटनाचे वर्गीकरण

## CLASSIFICATION OF TOURISM

पर्यटनाचे वर्गीकरण वेगवेगळ्या घटकांच्या आधारे केले जाते, त्यास 'पर्व वर्गीकरणाचे मूलाधार' असे म्हणतात. हे वर्गीकरण प्रामुख्याने राष्ट्रीयत्व, प्रवासाच कालावधी, प्रवासाचे अंतर, पर्यटकांची संख्या, पर्यटनाचा उद्देश आणि पर्यटनाचा दृष्टिको या आधारे केले जाते. पर्यटक पर्यटन करत असताना विविध हेतू मनात बाळगून प्रवास करतात. त्यात प्रवासाचे अंतर, वेळ, संख्या, पर्यटन स्थळे, पर्यटनाचा उद्देश यानुसार त्यांचे वर्गीकरण करता येते; या मुद्द्यांच्या आधारे पर्यटनाचे प्रकार पडतात. पर्यटकाचे विविध गट हे विविध पर्यटन स्थळांना भेटी देत असतात. शालेय सहलीचे आयोजन अभ्यासासाठी केले जाते. त्यामध्ये समूह पर्यटन घडून येते. असे अनेक उद्देश व पर्यटन स्थळांचा प्रभाव पर्यटनाच्या वर्गीकरणावर होत असतो.

### 1.राष्ट्रीयत्वाच्या आधारे पर्यटनाचे वर्गीकरण

(TOURISM BASED ON NATIONALITY)

राष्ट्रीयत्वाच्या आधारे किंवा राजकीय सीमांच्या आधारे पर्यटनाचे वर्गीकरण केले जाते. हे वर्गीकरण करत असताना पर्यटक प्रवास करताना एका देशातून दुसऱ्या देशात किंवा देशांतर्गत प्रादेशिक सीमा ओलांडून प्रवास करत असल्याचे दिसते. या आधारे पर्यटनाचे आंतरराष्ट्रीय किंवा परदेशी पर्यटन, देशांतर्गत पर्यटन, प्रादेशिक पर्यटन आणि स्थानिक पर्यटन हे प्रमुख चार प्रकार पडतात.

**आंतरराष्ट्रीय किंवा परदेशी पर्यटन :**

एका देशातून दुसऱ्या देशामध्ये होणाऱ्या पर्यटनास विदेशी किंवा परदेशी किंवा आंतरराष्ट्रीय पर्यटन असे म्हणतात. कोणत्याही देशाची आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून करमणूक किंवा विरंगुळा मिळविण्याच्या हेतूने केलेला प्रवास म्हणजे आंतरराष्ट्रीय किंवा दरवेशी पर्यटन होय.

परदेशी पर्यटनामध्ये एखादा पर्यटक आपल्या देशाची आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून इसया देशामध्ये दूरवर प्रवास करत असतो. या प्रकारचे पर्यटन करत असताना बराचसा अनावधी अगोदर पर्यटनाची तयारी करावी लागते. बऱ्याचदा हे पर्यटन खर्चीक असते. त्यामुळे विशिष्ट वर्गातील पर्यटक परदेशी पर्यटन करताना आढळतात, या पर्यटनामध्ये पासपोर्ट आणि व्हिसा या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते.

वाहतुकीसाठी हवाई, जल किंवा रस्ते वाहतूक प्रकारांचा उपयोग केला जातो,

पर्यटनाचे नियोजन करत असताना चलनामध्ये बदल होत असल्यास त्याबाबतचेही नियोजन करावे लागते. या प्रकारचे पर्यटन करत असताना ज्या देशात प्रवास करावयाचा आहे त्या देशाची परवानगी अत्यावश्यक असते. या प्रकारच्या पर्यटनामुळे मोठ्या प्रमाणात चलनप्राप्ती होत असते. परदेशी पर्यटक हा किमान दहा दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी प्रवास करत असतो. प्रवासाच्या दरम्यान या पर्यटकांकडून पंचतारांकित सोईसुविधा वापरल्या जातात. पाश्चात्य देशातून भारतासारख्या देशात अनेक पर्यटक दरवर्षी भेटी देत असतात. परदेशी पर्यटकांकडून जी पर्यटन स्थळे पाहिली जातात त्यामध्ये प्रामुख्याने जागतिक वारसा पर्यटन स्थळांचा अधिक भर असतो.

सद्यःस्थितीत आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यटनास चालना मिळावी म्हणून World Tourism Organisation ही यूनोची संघटना मोठ्या प्रमाणात कार्य करत आहे.

**देशांतर्गत /स्वदेशी पर्यटन :**

1.आपल्या स्थानिक ठिकाणापासून आपल्याच देशामध्ये केले जाणारे पर्यटन म्हणजे देशांतर्गत /स्वदेशी पर्यटन होय.

पर्यटक आपल्या स्थानिक ठिकाणापासून आपल्या स्वतःच्याच देशामध्ये इतर राज्यातील महत्त्वाची भौगोलिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळे पाहण्यासाठी अनेक लोक प्रवास करत असतात. आपल्याच देशात विविध ठिकाणी प्रवास करत असताना विविध हेतू साध्य करण्यासाठी किंवा विरंगुळा किंवा करमणूक म्हणून पर्यटन केले जाते. स्वदेशी पर्यटन राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि शैक्षणिक हेतूनेदेखील केले जाते.

एखाद्या पर्यटकाला आपल्याच देशातील पर्यटन स्थळे पाहण्याची इच्छा असते. तो पर्यटक संपूर्ण देशभर पर्यटन करतो. स्वदेशी पर्यटन करत असताना पूर्वनियोजन करणे आवश्यक असते. पर्यटन

करण्यासाठी वाहतुकीच्या कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत याची माहिती घ्यावी लागते. स्वदेशी पर्यटकाकडून अधिक प्रमाणात रेल्वे वाहतुकीचा, पर्याय निवडला जातो, पर्यटकांच्या आर्थिक कुवतीनुसार त्याच्या राहण्याची तसेच इतर सुविध उपभोगण्याचा प्रकार बदलत जातो. स्वदेशी पर्यटनामध्ये धार्मिक स्थळांना भेटी देण्याक पर्यटकांचा अधिक कल असतो. भारतामध्ये आपल्या स्थानिक स्वदेशी पर्यटन मोठ्या प्रमाणात केले जाते. ठिकाणापासून भारत हा देश विविधतेने नटलेला आहे. हवामानामध्येही प्रचंड मोठ्या प्रमाणात बदस भारतात दिसून येतो. त्यामुळे संपूर्ण भारतात विशिष्ट हंगामात विशिष्ट पर्यटन स्थळांना पर्यटक भेटी देत असतात, सागर किनारपट्टीच्या पर्यटन स्थळांना लोक डिसेंबर ते जानेवारी महिन्यात भेटी देतात. उत्तरेकडील बर्फाळ प्रदेश पाहण्यासाठी याच महिन्यात जातान दक्षिणेकडील पर्यटन स्थळांना साधारण मार्च व एप्रिल महिन्यात भेटी देतान भारतामध्ये धार्मिक स्थळांना भेटी देण्याकडे पर्यटकांचा अधिक कल असतो. भारतामध आम्ग्राचे ताजमहाल, जयपूरचे पॅलेस, मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया, विल्लीतील राजवार कोणार्कचे सूर्यमंदिर, भोपाळमधील खजुराहो लेणी, कंपकामोरीन कन्याकुमारी मंकि या सर्व पर्यटन स्थळांना हजारो पर्यटक दरवर्षी भेटी देत असतात. पर्यटनाला प्रोत्साहन मिळण्यासाठी भारतातील प्रत्येक राज्याने आपली पर्यटनसंदर्भात वेबसाइट सुरू केली आहे.

**प्रादेशिक पर्यटन :**

आपल्याच देशामध्ये एखादा भौगोलिक किंवा प्रशासकीय प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशामध्ये प्रवास करणे म्हणजे प्रादेशिक पर्यटन होय, आपल्या देशाची सीमा न ओलांडता देशांतर्ग विविध प्रदेशांमध्ये पर्यटन करणे, यास 'प्रादेशिक पर्यटन' असे म्हणतात.

आपला भौगोलिक प्रदेश सोडून पर्यटक दुसऱ्या भौगोलिक प्रदेशामध्ये पर्यटन करतात, उदा., महाराष्ट्रातील घाटमाथ्यावरील पर्यटक कोकणात प्रवास करतो किंवा विदर्भातील पर्यटन पश्चिम महाराष्ट्रात पर्यटन करतो. त्याचप्रमाणे सपाट मैदानी प्रदेशातील पर्यटक डोंगराळ ३ पर्वतीय प्रदेशात प्रवास करतो. या प्रकारच्या पर्यटनाला प्रादेशिक पर्यटन असे म्हणता येईल, पर्यटक आपली हवापालट करण्यासाठी किंवा भौगोलिक रचना जाणून घेण्यासाठ त्याचप्रमाणे करमणुकीसाठीदेखील प्रादेशिक पर्यटन करत असतो, प्रादेशिक पर्यटन एखाद्या सर्व आर्थिक वर्गातील पर्यटन करू शकतो, कारण प्रादेशिक पर्यटन करण्यासाठी जास्त खर्च येत नाही, हे पर्यटन करण्यासाठी आपला देश सोडून दुसऱ्या देशामध्ये जावे लागत नाही. म्हणून यासाठी येणारा खर्चदेखील कमी असतो. प्रादेशिक पर्यटनासाठी वाहतुकीचे कोणते पर्याय उपलब्ध आहेत; त्यामध्ये रस्ते रेल्वे-जल या वाहतुकीचे वेगवेगळे मार्ग उपलब्ध असतील तर कमी वेळेत आणि कमी खर्चात कोणता पर्याय योग्य आहे यानुसार पर्यटक पसंती करतात.

प्रादेशिक पर्यटनामध्ये पर्यटकांचा हेतूही भिन्न-भिन्न असतो, बऱ्याचवा मोठ्या वर्गातील हालेय सहलीकडून निवासस्थानला असताना प्रविशिकलो पोटाचा मोठ्या कार्तिल ३ प्रवेशिक पर्यटकाकडून निवासस्थानासाठी धर्मशाळा किंवा समूह निवासाची साधने वापरली जातात.

1.स्थानिक पर्यटन :

जे पर्यटन आपल्या जवळपासच्या भागात केले जाते त्याला 'स्थानिक पर्यटन' असे क्षणतात. आपल्या गावामध्ये किंवा शेजारच्या गावामध्ये केले जाणारे पर्यटन म्हणजे स्थानिक पर्यटन होय.

स्थानिक पर्यटन करण्यासाठी पर्यटकाला देशाबाहेर किंवा प्रदेशाबाहेर जावे लागत नाही. हे पर्यटन आपण ज्या ठिकाणी राहत असतो त्या ठिकाणापासून कमी अंतरावर आसपासच्या भागातच केले जाते. एका गावातून दुसऱ्या गावामध्ये अशा प्रकारचे पर्यटन केले जाते. या प्रकारचे पर्यटन कोणत्याही आर्थिक स्तरातील व्यक्ती करू शकते, गरीब व्यक्तीसुद्धा या प्रकारचे पर्यटन करू शकतो. कारण एका गावातून दुसऱ्या गावामध्ये जाण्यासाठी जास्त खर्च होत नाही. तसेच शेजारच्याच भागात पर्यटन केल्यामुळे निवासस्थानासाठी लागणाऱ्या खर्चातही बचत होते. कारण स्थानिक पर्यटनामध्ये पर्यटक एका दिवसात प्रवास करून पुन्हा आपल्या निवासस्थानावर मुक्कामी येत असतो. त्यामुळे या प्रकारच्या पर्यटनास खर्च जास्त येत नाही. या पर्यटनासाठी लागणारा कालावधी एका दिवसाचा किंवा दिवसाचा किंवा काही तासांचा असतो. म्हणून कोणीही या प्रकारचे पर्यटन करतात.

स्थानिक पर्यटनामध्ये अंतर कमी असल्यामुळे पर्यटनासाठी वाहतुकीच्या साधनामध्ये रस्ते वाहतुकीचा अधिक उपयोग केला जातो. स्थानिक पर्यटन प्रामुख्याने खेळ खेळण्यासाठी, मनोरंजनासाठी, धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी अधिक प्रमाणात केले जाते.

हवापालट करण्यासाठीदेखील या प्रकारचे पर्यटन केले जाते. उदा., पुणे किंवा मुंबई या शहरापासून माथेरान, लोणावळा-खंडाळा, महाबळेश्वर, पाचगणी ही पर्यटन स्थळे जवळची असल्यामुळे या पर्यटन स्थळांना हजारो पर्यटक विकेन्डला भेटी देत असतात.

अलीकडील काळात बदललेल्या राहणीमानामुळे शहरी भागातील लोक आठवड्याच्या शेवटी किंवा सलग सुट्ट्या मिळालेल्या दिवशी जवळच्या पर्यटन स्थळांना भेटी देऊन करमणुकीचा आनंद घेत असतात.

**2.प्रवासाच्या कालावधीनुसार पर्यटनाचे वर्गीकरण**

**(TOURISM BASED ON TRAVEL TIME)**

प्रवासाच्या कालावधीनुसार पर्यटनाचे विविध प्रकार होतात, पर्यटक हा पर्यटनास निघाल्यानंतर विविध पर्यटन स्थळांना भेटी देत असतो. पर्यटक भेटी देत असलेली पर्यटन स्थळे कोणत्या परिसरात आहेत त्यानुसार त्याचा पर्यटनाचा कालावधी ठरत असतो. दूरच्या अंतरावरील पर्यटन स्थळे, परदेशी पर्यटन स्थळे पाहण्यासाठी जास्त दिवस लागू शकतात, तसेच जवळच्या अंतरावरील स्थळे पाहण्यासाठी कालावधी कमी लागतो. आपल्याच स्थानिक प्रदेशातील पर्यटन स्थळे एका दिवसातच पाहून होतात. काही पर्यटन स्थळांना विशिष्ट हंगामातच भेटी द्याव्या लागतात. बर्फाने आच्छादिक ठिकाणे पाहण्यासाठी हिवाळा या ऋतूतच प्रवास करावा लागतो. त्याचाही परिणाम पर्यटनाच्या कालावधीवर होत असल्याचे दिसते. परदेशी पर्यटनास जाणाऱ्या पर्यटकांना काही महिन्यांचा कालावधी लागतो.

अभ्यासक विद्यार्थी तसेच विविध परिषदांमध्ये सहभागी होणाऱ्या पर्यटकांचा पर्यटन कालावधीदेखील काही महिन्यांचा असतो. प्रवासाच्या कालावधीनुसार पर्यटनाचे पुढील प्रकार पडतात :

**1.दीर्घ कालावधीचे पर्यटन :**

दीर्घ कालावधीचे पर्यटन हे दुसऱ्या अंतरावरील प्रदेशात केले जाते. पर्यटन कालावधी जास्त असल्यामुळे पर्यटकांकडून अनेक प्रकारची पर्यटन स्थळे पाहिली जातात. या प्रकारच्या पर्यटनामध्ये अभ्यासक, विद्यार्थी आणि हौशी पर्यटक जास्त संख्येने सहभागी होतात.

व्याख्या : “एका आठवड्यापेक्षा अधिक काळ करमणूक व आनंद मिळविण्यासाठी केल्या जाणाऱ्या पर्यटनास दीर्घ कालावधीचे पर्यटन असे म्हणतात.”

दीर्घ कालावधीच्या पर्यटनाची वैशिष्ट्ये :

1.दीर्घ कालावधीच्या पर्यटनाचा कालावधी एका आठवड्यापेक्षा जास्त असून सहा महिन्यांपर्यंत असू शकतो.

2.परदेशी पर्यटकांकडून दीर्घ कालावधीचे पर्यटन अधिक प्रमाणात केले जाते. उदा., पाश्चात्त्य देशातून भारतात आलेले पर्यटक.

3.दीर्घकाळ पर्यटनासाठी जात असताना पर्यटनाचे योग्य प्रकारे नियोजन केले जाते. ज्या पर्यटन स्थळांना भेटी द्यावयाच्या असतील त्यांची संपूर्ण माहिती सोबत घेतली जाते.

4.दीर्घ कालावधीसाठी जाणाऱ्या पर्यटकांकडून वाहतुकीची माध्यमे म्हणून विमान वाहतूक, रेल्वे वाहतूक आणि जल वाहतुकीचा पर्याय अधिक प्रमाणात उपयोगात आणला जातो. क्वचितप्रसंगी रस्ते वाहतुकीचा उपयोग केला जातो.

5) दीर्घ कालावधीच्या पर्यटनासाठी जाणाऱ्या परदेशी पर्यटकांकडून पंचतारांकित सोईसुविधा उपभोगल्या जातात.

6.दीर्घ कालावधीचे पर्यटन करणाऱ्या स्वदेशी पर्यटकांकडून निवासस्थाने म्हणून हॉटेल, धर्मशाळा किंवा इतर किफायतशीर निवासस्थाने उपयोगात आणली जातात.

7.दीर्घ कालावधीचे पर्यटन अभ्यासक, विद्यार्थी, फकीर, धर्मगुरू यांच्याकडून अधिक प्रमाणात केले जाते.

8)दीर्घ कालावधीचे पर्यटन हे खचर्चीक असते. त्यामुळे आर्थिक सुबत्ता असलेल्या पर्यटकांकडून हे पर्यटन केले जाते.

9.दीर्घ कालावधीच्या पर्यटनामध्ये सोबत अधिक प्रमाणात साहित्य घेऊन जावे लागते. सोबत अधिक साहित्य असणे बऱ्याचदा अडचणीचे होते.

10.दीर्घ कालावधीसाठी जाणाऱ्या पर्यटकांकडून थंड हवेची ठिकाणे, शैक्षणिक संकुले, जागतिक वारसा स्थळे, समुद्रकिनारे यांना भेटी विल्या जातात,

**II. कमी कालावधीचे पर्यटन :**

कमी कालावधीचे पर्यटन बऱ्याचदा आपल्या प्रदेशात अथवा राज्यांतर्गत केले जाते. पर्यटनाचा कालावधी कमी असल्याने स्थानिक प्रदेशातील पर्यटन स्थळे पाहण्याकडे पर्यटकांचा अधिक कल असतो. शाळा-महाविद्यालयीन सहलींचे आयोजन करताना कालावधी कमीच असतो.

व्याख्या : “स्थानिक प्रदेशात करमणूक किंवा विरंगुळा मिळविण्याच्या हेतूने दोन किंवा तीन दिवसांकरिता केले गेलेले पर्यटन म्हणजेच कमी कालावधीचे पर्यटन होय.”

कमी कालावधीच्या पर्यटनाची वैशिष्ट्ये :

1.कमी कालावधीच्या पर्यटनाचा कालावधी दोन किंवा तीन दिवसांचा असतो.

2.स्थानिक पर्यटकांकडून कमी कालावधीचे पर्यटन अधिक प्रमाणात केले जाते. उदा., स्थानिक प्रदेशातील अथवा राज्यातील पर्यटन स्थळे पाहण्याकडे पर्यटकांचा अधिक कल असतो. पुणे किंवा मुंबई येथून महाबळेश्वर व पाचगणी येथे केलेले पर्यटन.

3.कमी कालावधीच्या पर्यटनासाठी जात असताना बऱ्याचदा पर्यटन स्थळांविषयी पर्यटकांना पुरेशी माहिती असते. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होत नाहीत.

4.कमी कालावधीसाठी जाणाऱ्या पर्यटकांकडून वाहतुकीची माध्यमे म्हणून रस्ते वाहतुकीचा पर्याय अधिक प्रमाणात उपयोगात आणला जातो. परंतु देशांतर्गत भ्रमंती करण्यासाठी अपुरा वेळ असल्यास विमान वाहतुकीचा पर्यायही निवडला जातो.

5.कमी कालावधीच्या पर्यटनासाठी जाणारे पर्यटक बऱ्याचदा सर्वसामान्य आर्थिक परिस्थिती असल्यामुळे कमी खर्चात पर्यटन कसे होईल अशा पद्धतीने नियोजन केले जाते.

6.कमी कालावधीचे पर्यटन करणाऱ्या स्वदेशी पर्यटकांकडून निवासस्थाने म्हणून हॉटेल धर्मशाळा किंवा इतर किफायतशीर निवासस्थाने उपयोगात आणली जातात.

7.दीर्घ कालावधीचे पर्यटन अभ्यासक, विद्यार्थी, परिषदांमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्ती यांच्याकडून अधिक प्रमाणात केले जाते.

8.कमी कालावधीचे पर्यटन हे किफायतशीर असल्यामुळे सर्व पर्यटकांकडून है पर्यटन केले जाते.

9.कमी कालावधीच्या पर्यटनामध्ये सोबत अधिक प्रमाणात साहित्य घेऊन जावे लागत नाही.

10.दीर्घ कालावधीसाठी जाणाऱ्या पर्यटकांकडून थंड हवेची ठिकाणे, विविध प्रकारची धार्मिक स्थळे, शैक्षणिक संकुले, समुद्रकिनारे यांना भेटी दिल्या जातात.

**हंगामी पर्यटन :**

हंगाम म्हणजेच ऋतू होय. त्यामुळे हंगामी पर्यटनास 'ऋतुकालीन पर्यटन' असेही म्हणतात. विशिष्ट हंगामामध्ये विशिष्ट प्रकारच्या पर्यटन स्थळांना भेटी देणे बऱ्याचदा इश् असते. हवामानातील होणाऱ्या बदलामुळे पर्यटन स्थळावरील भौगोलिक घटकांमध्ये बदल होत असतो. उदा., वाळवंटी प्रदेशात उन्हाळ्याच्या दिवसात उष्णता अतिशय जास्त असते. त्यामुळे या प्रदेशांना उन्हाळ्यात भेटी देणे शक्य नसते. या प्रदेशांना हिवाळा ऋतू पर्यटनासाठी सोईस्कर असतो. त्यामुळे उन्हाळा, पावसाळा व हिवाळा या ऋतूंमध्ये विशिष्ट पर्यटन स्थळांना भेटी दिल्या जातात.

व्याख्या: "करमणूक किंवा विरंगुळा मिळविण्याच्या हेतूने विशिष्ट हंगामात विशिष्ट पर्यटन स्थळांना भेटी दिल्या जातात; या पर्यटनास 'हंगामी पर्यटन' असे म्हणतात."

**हंगामी पर्यटनाची वैशिष्ट्ये :**

1.हंगामी पर्यटन विशिष्ट काळातच केले जाते. विशिष्ट हंगामामध्ये विशिष्ट पर्यटन स्थळे पाहण्यायोग्य असतात. त्यामुळे अशा पर्यटन स्थळांचा त्याच कालावधीत भेटी द्याव्या लागतात.

2.हंगामी पर्यटनास जाणाऱ्या पर्यटकांमध्ये हौसी पर्यटकांची संख्या अधिक असते.

3.हंगामी पर्यटन करत असताना बराच दूरवर प्रवास करावा लागतो. कारण स्थानिक प्रदेशातील हवामान वगळून इतर प्रदेशातील हवामान व नैसर्गिक देखाव्यांचा आस्वाद घेण्याकडे या पर्यटकांचा कल अधिक प्रमाणात असतो.

4.हंगामी पर्यटन बहुधा बरेचसे खर्चीक असते. कारण ऋतूबदल करून पर्यटक प्रवास करत असतात. उदा., महाराष्ट्रातून हिमवृष्टी पाहण्यासाठी हिमालयाच्या परिसरात प्रवास करणारे पर्यटक,

5.पाश्चात्य देशातील पर्यटकांकडून हंगामी पर्यटन अधिक प्रमाणात केले जाते. पाश्चात्य देशातील बरेचसे पर्यटक हिवाळ्याच्या दिवसात भारतीय उपखंडातील पर्यटन स्थळांना भेटी देत असतात. कारण पाश्चात्य देशात हिवाळा हा ऋतू डिसेंबर ते मार्च या दरम्यान असतो, या कालावधीत त्या देशामध्ये प्रचंड कडक हिवाळे असतात. तुलनेने भारतात जरी हिवाळा ऋतू असला तरी तो 'उबदार हिवाळा' या प्रकारामध्ये येतो.

6.भारतात हिवाळ्याच्या विवसात स्थानिक पर्यटक समुद्रकिना-याच्या प्रदेशात पर्यटन करण्यास प्राधान्य देतात, कारण किनारपट्टीच्या प्रदेशात या ऋतूमध्ये हवामान उबदार असते.

7.उन्हाळ्याच्या हंगामामध्ये थंड हवेच्या ठिकाणांना पर्यटक अधिक प्रमाणात भेटी देतात. थंड हवेची बहुतांशी पर्यटन स्थळे ही पर्वतीय प्रदेशात पाहावयास मिळतात.

8.भारतातून पाश्चात्य युरोप आणि अमेरिका खंडातील देशांना भेटी देताना उन्हाळ्याच्या दिवसात भेटी दिल्या जातात.

9.हंगामी पर्यटन करणारे पर्यटक हौशी पर्यटक असतात. त्यामुळे या पर्यटकांकडून मोठ्या प्रमाणात पैसा खर्च केला जातो.

10.हंगामी पर्यटकांकडून पर्यटन करत असताना तारांकित सुविधा अधिक प्रमाणात वापरल्या जातात.

11.ऋतुकालीन पर्यटन करणारे पर्यटक थंड हवेची ठिकाणे, समुद्रकिनारे, बर्फाच्छादित प्रदेश, जास्त पर्जन्य पडणारी ठिकाणे, उष्ण वाळवंटे या प्रदेशांना अधिक प्रमाणात भेटी देतात.

12.हंगामी पर्यटनामध्ये भौगोलिक ठिकाणांना भेटी देण्याचे प्रमाण अधिक असते. पर्यटन स्थळावरील निसर्ग पाहणे व त्याचा आस्वाद घेणे हे पर्यटकांकडून पसंत केले जाते. त्यामुळे हंगामी पर्यटन हे निसर्ग पर्यटन असते.

**एक दिवशीय पर्यटन :**

एकाच दिवसात सकाळी लवकर निघून आसपासच्या प्रदेशातील पर्यटन स्थळे पाहून संध्याकाळी परत स्वगृही परत येणाऱ्या पर्यटकांना 'एक दिवशीय पर्यटन' असे म्हणतात. एकाच दिवसात पर्यटनाची समाप्ती होत असल्यामुळे स्थानिक प्रदेशातील एखाद्या किंवा दोन पर्यटन स्थळांना पर्यटकांकडून भेटी दिल्या जातात, या पर्यटनामध्ये कमी अंतरावरील पर्यटन स्थळांवर जाणे पर्यटकांकडून पसंत केले जाते. खेळ खेळण्यासाठी, चित्रपट पाहणे, नौकानयन करणे इत्यादी कारणांसाठी एक दिवशीय पर्यटन अधिक प्रमाणात केले जाते,

व्याख्या: "करमणूक किंवा आनंद मिळविण्याच्या हेतूने जवळच्या प्रदेशात एका दिवसा फेरफटका मारून स्वगृही परत येणे या प्रकारच्या पर्यटनास एक दिवशीय पर्यटन असे म्हणतात."

**एक दिवशीय पर्यटनाची वैशिष्ट्ये :**

1.एक दिवशीय पर्यटनास जाताना मनोरंजन किंवा करमणूक हा मर्यादित के असतो.

2.शाळा-महाविद्यालयाच्या एक दिवशीय सहली हे एक दिवशीय पर्यटनाचे उत्तम ( उदाहरण आहे.

3.एक दिवशीय पर्यटन जवळच्या प्रदेशात केले जात असल्याने पर्यटल स्थळाविषयी पर्यटकांना पुरेपूर माहिती असते.

4.एक दिवशीय पर्यटनामध्ये पर्यटक स्वगृही परत येत असल्यामुळे त्याच्याकडून कोणत्याही प्रकारच्या निवासस्थानाचा उपयोग केला जात नाही.

5.एक दिवशीय पर्यटन करणाऱ्या पर्यटकांकडून वाहतुकीसाठी स्वतःच्या वाहनाचा अथवा इतर खाजगी वाहनांचा अधिक प्रमाणात उपयोग केला जातो.

6.एक दिवशीय पर्यटनासाठी अतिशय कमी खर्च येत असल्यामुळे आर्थिक क्षमता कमी असणाऱ्या पर्यटकांकडून हे पर्यटन अधिक प्रमाणात केले जाते.

7.या पर्यटनामध्ये पर्यटन स्वतःजवळील सोईसुविधांचा अधिक प्रमाणात उपयोग करतात.

8.धार्मिक ठिकाणे, परिसरातील थंड हवेची ठिकाणे, चित्रपटगृहे, नौकानयनाचां ठिकाणे, खेळ खेळण्याची ठिकाणे, सागर किनारे, किल्ले, उद्याने या प्रकारच्या ठिकाणांना एका दिवसात भेटी देण्याकडे पर्यटकांचा अधिक कल असतो.

9.स्थानिक प्रदेशात एक दिवशीय पर्यटन केले जात असल्याने विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत नाही.

**उद्देशानुसार पर्यटनाचे वर्गीकरण (TOURISM BASED ON PURPOSE)**

**1.धार्मिक पर्यटन :**

धार्मिक पर्यटनास 'भक्ती पर्यटन असेही म्हणतात. धार्मिक कर्मकांड, व्रतवैकल्ये, आचारविचार, जीवनप्रणाली ही मानवास उपजत प्रवृत्ती आहे. धार्मिक पर्यटन हा पर्यटनाचा सर्वांत प्राचीन प्रकार आहे. प्राचीन काळापासून भारतातील बारा ज्योतिर्लिंगांची यात्रा, चारधाम यात्रा, शक्तिपीठांची यात्रा प्रसिद्ध आहे. याशिवाय जगामधील इजिप्त, रोम, व्हेनिस, व्हॅटिकन सिटी, मक्का, मदिना या ठिकाणी पर्यटक मोठ्या प्रमाणात भेटी देतात.

धार्मिक कार्य करण्यासाठी प्रत्येक धर्मातील लोक आपल्या धर्माच्या पवित्र स्थळांना मौटी देवेत एकदा तरी या ठिकाणांना भेटी दिल्या पाहिजेत असा साधारण प्रघातच असल्याचे दिसते.

मुस्लीम धर्माच्या अनुयायांनी एकदा तरी हज यात्रा केली पाहिजे असा संकेत आहे.

हिंदू धर्माच्या अनुयायांनी ज्योतिर्लिंगांची यात्रा, चारधाम यात्रा, अष्टविनायक यात्रा, परिक्रमा करणे पुण्यकर्म समजले जाते.

जैनधर्मीय लोक माउंटअब्बू, राजस्थान व गुजरातमधील इतर पवित्र स्थळांना भेटी देत असतात.

बौद्ध धर्माचे अनुयायी लुम्बिनी, बोधगया, सांची या ठिकाणांना भेटी देतात. थोडक्यात, प्रत्येक धर्मातील लोक आपापल्या धर्मातील पवित्र स्थळांना भेटी देत असतात. अलीकडील काळात सर्वधर्मीय प्रार्थना स्थळांना भेटी देण्याचे प्रमाणही प्रचंड वाढलेले आहे. शिर्डी येथील साईबाबाचे दर्शन घेण्यासाठी या धार्मिक स्थळास सर्व धर्मातील लोक भेटी देत असतात. मानवाच्या धार्मिक भावना अतिशय प्रखर असतात. इतर कोणत्याही कारणामुळे आपल्या धर्माच्या पवित्र स्थळांना भेटी देणे आणि त्या ठिकाणी

जाऊन पूर्जाअर्चा करणे, व्रतवैकल्ये करणे हे कर्तव्य समजले जाते. या कर्तव्याच्या भावनेतून लाखोंच्या संख्येने लोक आपापल्या धार्मिक स्थळांना भेटी देत असतात.

जगामध्ये सर्वाधिक घडून येणारे पर्यटन म्हणजे धार्मिक पर्यटन होय.

उदाहरणार्थ, सन 2019 नुसार, मागील पाच वर्षांमध्ये शिर्डीच्या साईबाबांच्या दर्शनासाठी दररोज वीस हजाराहून अधिक भाविक भेटी देत आहेत. अलीकडील काळात हा आकडा साठ हजारच्या पुढे गेल्याचे दिसते.

सन 2015 च्या रमजान महिन्यामध्ये मक्का या मुस्लीमधर्मीय पवित्र स्थळास चौदा कोटी लोकांनी भेटी दिल्याच्या नोंदी आहेत. व्हॅटिकन सिटी या ख्रिस्ती धर्माच्या पवित्र स्थळास चार कोटीहून अधिक लोक भेटी देतात. तिरुपती बालाजी या पवित्र स्थळास दरवर्षी चाळीस कोटीहून अधिक भाविक भेटी देतात.

याशिवाय पुढील महत्त्वाच्या पर्यटन स्थळांना लाखोंच्या संख्येने भक्त भाविक भेटी देत असतात.

जागतिक धार्मिक पर्यटन मक्का, मदिना (सौदी अरेबिया), करबला (इराक), फातिमा (पोर्तुगाल), जेरुसलेम (इस्रायल), आक्सुम (इथिओपिया), ॲलेक्झांड्रिया (इजिप्त), मेक्सिको सिटी (मेक्सिको), रोम कॅथॉलिक चर्च, व्हेनिस चर्च (इटली), पॅरिस (फ्रान्स), तारीम बेसीन (सुफी इस्लाम येमेन), लुम्बिनी (बौद्ध - नेपाळ), व्हॅटिकन सिटी (ख्रिश्चनधर्मीय चर्च).

भारतातील धार्मिक पर्यटन वैष्णवदेवी मंदिर (जम्मू-काश्मीर), कोणार्कचे सूर्य मं (ओडिशा), जगन्नाथ मंदिर (पुरी, ओडिशा), तिरुमला व्यंकटेश्वर (तिरुपती, आ.प्र सोमनाथ (गुजरात), रणकपूर मंदिर, माउंटअबू (जैन, राजस्थान), त्रिवेंद्रम पद्मना (केरळ), वाराणसी/काशी, मथुरा, वृंदावन (उत्तर प्रदेश), द्वारका (गुजरात), हृषिकेश (मध्य प्रदेश), रामेश्वरम्, मदुराई (तमिळनाडू). (वैवभूमी, उत्तराखंड),

तसेच सुवर्ण मंदिर/हरमंदिर साहिब (अमृतसर, पंजाब), हेमकुंड साहिब (उत्तराखंड, अजमेर शरीफ दर्गा, पुष्कर लेक (राजस्थान), वेलणकान्नी चर्च (नागापट्टणम्, तमिळनाडू बाबा बर्फानी/अमरनाथ (जम्मू-काश्मीर), पौटा साहिब (हिमाचल प्रदेश), गोव्यातील परं हम्पी (कर्नाटक), बोधगया (बिहार).

महाराष्ट्रातील पंढरपूर, आळंदी, देहू, भीमाशंकर, कोल्हापूरची महालक्ष् माहूरची रेणुका, वणीची सप्तश्रृंगी माता, तुळजापूरची भवानीमाता, गणपतीपुळे, लालबर शिर्डीचे साईबाबा, शेगावचे सद्गुरू श्री गजानन महाराज, अक्कलकोटचे श्री स्वामी समई जेजुरीचे खंडोबा, शनि-शिंगणापूर येथे हिंदूधर्मीय भक्त मोठ्या प्रमाणात येत असतात.

महाराष्ट्रातील हाजी अली येथे मुस्लीमधर्मीय लोक मोठ्या प्रमाणात येतात.

वरील सर्व धार्मिक स्थळांना भक्तांनी भेटी दिल्यामुळे धार्मिक पर्यटन मोठ्या प्रमाणात घडून येत असल्याचे दिसते.

धार्मिक पर्यटनामुळे लोकांमध्ये धार्मिक सहिष्णुता निर्माण होताना दिसते. अलीकडील काळात धार्मिक कार्यासाठी भेटी देण्याबरोबर विविध धार्मिक स्थळांना भेटी देणाऱ्या लोकांचे प्रमाणही मोठे आहे.

**करमणूकप्रधान पर्यटन :**

पर्यटनाचा मुख्य हेतू हा करमणूकप्रधान आहे. आपल्या दैनंदिन कामातून वेळ काढून लोक एखाद्या पर्यटन स्थळाला भेट देतात तेव्हा त्यामागे करमणूक हाच मुख्य हेतू असतो. प्रत्येक व्यक्ती आपण जे दैनिक काम करतो त्या व्यतिरिक्त जो मोकळा वेळ असतो त्या वेळेला फावला वेळ असे म्हणता येईल. अनेक लोक या फावल्या वेळेमध्ये मनोरंजन अथव करमणुकीसाठी विविध प्रकारचे छंद जोपासतात. मोकळा वेळ व्यतित करण्यासाठी काही लोक इनडोअर खेळ खेळतात तर काही लोक निसर्गाच्या सान्निध्यात जातात. निसर्गाच्या सान्निध्यात अथवा विविध स्थळांना भेटी देणे व करमणूक करून घेणे ह अलीकडील काळातील प्रघात होऊ पाहत आहे. पर्यटन हे निसर्गसंपन्न परिसरात, धार्मिक स्थळांच्या परिसरात तसेच ऐतिहासिक स्थळांच्या परिसरात केले जाते. अनेक लोक मनोरंजनासाठी व हवापालट करण्यासाठी विविध स्थळांना भेटी देतात. या भेटी देण्यामध्ये पर्यटन घडून येत असते. करमणूक अथवा विरंगुळा मनाला उत्साह निर्माण करतो.

बौद्धिक काम करणाच्या व्यक्ती मानसिक ताण कमी करण्यासाठी व थकवा दूर करण्यासाठी - हवापालट करत असतात, त्यामुळे पर्यटनाचे स्वरूप हे करमणूकप्रधामना दूर करा यासाठी  पर्यटनामुळे करमणूक घडून येत असल्याचे दिसते.

**शैक्षणिक पर्यटन :**

मानवाची प्रगती शिक्षणामधूनच झालेली आहे. शिक्षणामधूनच जगातील - विविध संस्कृतीची ओळख मानवाला झाली, अतिप्राचीन कालखंडात शिक्षणासाठी - विशेष शैक्षणिक ठिकाणांची नावे आली होती. उदाहरणच द्यायचे झाले तर भारतातील नालंदा, तक्षशिला, वल्लभी, कांची ही विद्यापीठे जगप्रसिद्ध होती. या शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी जगभरातून विद्यार्थी येत असत. त्यामुळे जागतिक शैक्षणिक संस्थांनासुद्धा पर्यटनाचा महत्वाचा भाग समजला जातो. शिक्षणसंस्थांच्या ठिकाणी संशोधकाला अन्न-वस्त्र-निवारा या सुविधा मोफत असतात. त्यामुळे देशा-देशातील विद्यार्थी या ठिकाणी उच्च शिक्षण घेण्यासाठी येत असतात.

आधुनिक कालखंडामध्ये इंग्लंडमधील ऑक्सफर्ड, कैंब्रिज आणि अमेरिकेतील हॉर्वर्ड या शिक्षणसंस्थांनी येथील पर्यटन विकासाला महत्त्वाचा हातभार लावला आहे. नासा ही अमेरिकन अंतराळ संशोधन संस्था पर्यटकांचे आकर्षण बनले आहे. त्याचबरोबर भारतामधील तिरुअनंतपुरम येथे असलेले इस्रो हे सुद्धा पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे. असे पर्यटक विविध प्रशिक्षण संस्था, वैज्ञानिक प्रदर्शने, वस्तुसंग्रहालय यांना भेटी देत असतात; कारण सध्या ही महत्त्वाची आकर्षणे बनली आहेत.

**परिषदविषयीचे पर्यटन :**

आधुनिक कालखंडामध्ये पर्यटनाचा हा प्रकार नव्यानेच रूढ होऊ लागलेला आहे. अनेक ठिकाणी शैक्षणिक, व्यापारी व वाणिज्यविषयक सामाजिक, राजकीय नेते या विषयांसंबंधित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक परिषदांचे आयोजन केले जाते. या परिषदांमध्ये जगभरातून संशोधक, अभ्यासक, विद्यार्थी भेटी देत असतात. या परिषदांच्या माध्यमातून पर्यटक या ठिकाणी जातात, तेव्हा जवळ असलेल्या पर्यटन केंद्रांना म्हणजेच ऐतिहासिक स्थळे, धबधबे, शिखरे, अभयारण्ये, धरणे, थंड हवेची ठिकाणे यांना भेटी देतात. त्यातूनच वेगवेगळ्या ठिकाणाच्या संस्कृतीची ओळख करून घेतली जाते. शक्यतो परिषदांविषयीचे पर्यटन हे मोठ्या शहरांमध्ये भरविले जाते की, ज्या शहराचा इतिहास नावीन्यपूर्ण असतो आणि त्यातूनच त्या शहराची सांस्कृतिक ओळख अभ्यास करताना करून दिली जाते. परिषद विशेष पर्यटनामध्ये प्रामुख्याने भारतातील मुंबई, दिल्ली, कोलकता, चेन्नई आणि जगातील सॅनफ्रान्सिस्को, व्हर्सोवा, लॉस एंजिल्स, केपटाउन, शांघाय, टोकिओ ही शहरे नावाजलेली आहेत.

**फुरसतीचे पर्यटन :**

अशा पर्यटनामध्ये नोकरदारवर्ग हा पुढे असतो. सुट्टीच्या कालखंडामध्ये असे पर्यट घडून येते. या पर्यटनामध्ये निवासी व हंगामी अशा दोन्ही पर्यटकांचा यात समावेश हो घडून येते. या फळापासून व कामाच्या व्यापातून दूर एकान्त मिळावा म्हणून पर्यटक ॐ नेवीच्या धावपदरीजाच्या जीवनातील ताणतणावामधून मुक्तता व्हावी व आनंद मिळावा है या पर्यटनाचा उद्देश असतो. असे पर्यटन वेगवेगळ्या ऋतूंमध्ये बहरते. पावसाळ्यान वर्षाविहारासाठी पर्यटक बाहेर पडतात तर उन्हाळ्यात मुलांच्या शाळेला सुट्टी लागल्यामुर थंड हवेच्या ठिकाणी सहकुटुंब प्रवास केला जातो.

**व्यवसाय पर्यटन :**

व्यवसाय पर्यटनामध्ये अनेक व्यावसायिकांनी केलेल्या प्रवासाचा समावेश होती. उत्पादित केलेल्या मालाची जाहिरात करण्याच्या उद्देशाने व्यावसायिक वेगवेगळ्या व्यवसाय प्रदर्शनांना भेटी देत असतात. त्याचबरोबर ग्रामीण भागात आजही गावोगावी भरणाऱ्या यात्रेमध्ये अनेक व्यावसायिक आपल्या वस्तू विकण्यासाठी दररोज वेगवेगळ्या गावांमध्छे प्रवास करत असतात. अशा व्यवसायानिमित्त होणाऱ्या पर्यटनातूनच प्रदर्शन केंद्राच्या आजूबाजूच्या प्रेक्षणीय स्थळांना सहभागी लोक भेटी देतात. यातूनच व्यवसाय पर्यटन वाढीला लागते.

**जंगल सफरिंगचे पर्यटन :**

अभयारण्याच्या सान्निध्यात आलेल्या पर्यटकांना जंगल भागात सफरी घडवून आणल्या जातात. भारतातील ताडोबा अभयारण्य असेल अथवा गीरचे अभयारण्ये असेल; या ठिकाणी वन विभागाकडून

अशा सहलींचे अथवा जंगल सफरीचे आयोजन केले जाते. अशा जंगल सफरीमध्ये पर्यटकांना विविध प्राणी अतिशय जवळून पाहता येतात. विविध प्राण्यांचे किंवा पक्ष्यांचे अभ्यास करणारे अभ्यासक या सहलींना महत्त्व देताना दिसून येतात. भारतातील सिमला, उटी, दार्जिलिंग या ठिकाणी जंगले जास्त असल्यामुळे ही स्थळे पर्यटन केंद्रे बनली आहेत.

**वारसा पर्यटन :**

वारसा पर्यटनाला इंग्रजीमध्ये 'Heritage/Tradition Tourism' असे म्हणतात. याचा अर्थ, परंपरेने किंवा प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेला अमूल्य ठेवा की ज्याचे जतन व संवर्धन पुढील काळातील पिढ्यांनी करणे अपेक्षित आहे.

व्याख्या: "जागतिक दर्जाचा अमूल्य ठेवा असलेली वारसा स्थळे पाहण्यासाठी व त्यांचा अभ्यास करण्यासाठी केलेले पर्यटन म्हणजे वारसा पर्यटन होय."

**पर्यटकांच्या संख्येनुसार पर्यटनाचे वर्गीकरण**

**(TOURISM BASED ON TOURIST STATISTICS)**

मानव हा प्राणी समूहाने किंवा गटाने राहणारा समाजशील प्राणी आहे. पर्यटन के करमणूक किंवा मौजेसाठी केले जात असते. त्यामुळे पर्यटनास जाताना तो एकटा फार क्वचितच जात असतो. तो समूहाने जाणे पसंत करतो, त्यामुळे पर्यटकांची संख्या विचारात घेता तो कोणत्या गटात सहभागी होऊन पर्यटन करत आहे हे महत्त्वाचे आहे.

अलीकडील काळात खाजगी प्रवासी कंपन्यांकडून पर्यटकांसाठी अनेक पर्याय उपलब्ध करून दिलेले असतात. यामध्ये कुटुंब सहल, मधुचंद्र विशेष, विद्यार्थ्यांसाठी-महिलांसाठी- एकट्यासाठी एका देशात किंवा एकापेक्षा अधिक देशात असे अनेक पर्याय उपलब्ध असतात. यामधून पर्यटक आपल्या आवडीनुसार पर्यटकांच्या संख्येचा आणि उद्देशाचा गट निवडत असतो.

**पर्यटकांच्या संख्येनुसार पर्यटनाचे पुढील प्रकार पडतात :**

1.**समूह पर्यटन** : समूहाने राहणे ही मानवाची उपजत प्रवृत्ती असल्याने तो प्रवासही बऱ्याचदा समूहाने करत असतो. त्यामधून समूह पर्यटन घडून येत असते. अलीकडील काळात समूहाने पर्यटन घडवून आणणाऱ्या बऱ्याच खाजगी संस्था विकसित झालेल्या आहेत. यामध्ये वीणा वर्ल्ड, मेक माय ट्रीप, थॉमस कुक, कॉक्स ॲन्ड किंग, क्लिअर ट्रिप, इंडियन टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, क्लब महिंद्रा, यात्रा डॉट कॉम, ताज ग्रुप आणि इन्सेलबर्ग इंडिया या कंपन्या भारताबरोबरच भारताबाहेरील संपूर्ण जगात समूहाने पर्यटन घडवून आणतात.

या सर्व कंपन्यांच्या माध्यमातून विशिष्ट प्रकारचा उद्देश समोर ठेवून पर्यटन घडवून आणार जात असते. या प्रकारचे पर्यटन करणे अनेक बाजूंनी फायदेशीर असते. त्यामुळे असंख्य पर्यटन समूह पर्यटन करताना दिसून येतात.

व्याख्या: “करमणूक किंवा आनंद मिळविण्यासाठी समूहाने किंवा गटाने पर्यटन करणे म्हणजेच समूह पर्यटन होय.”

**समूह पर्यटनाची वैशिष्ट्ये**

1.समूह पर्यटन हे वहापेक्षा अधिक लोक एकत्र येऊन केले जाते.

2.देशांतर्गत समूह पर्यटन करत असताना गटाचा आकार हा बराच मोठा असतो. समूह पर्यटनातील गटात काही लाख लोक एकत्र येऊन पर्यटक करू शकतात. उदा., पंढरपूर व आळंदीची वारी.

3.देशाबाहेर समूह पर्यटन करत असताना गटाचा आकार हा मर्यादित असतो.

4.समूह पर्यटनाच्या माध्यमातून सामाजिक आणि सांस्कृतिक ऐक्याची भावना वाढीस लागण्यास मदत होते.

5.धार्मिक पर्यटन करणारे पर्यटक बहुतांशी समूहाने पर्यटन करत असतात.

6.समूह पर्यटनास जाणाऱ्या व्यक्ती विशिष्ट उद्देशाने पर्यटन करत असतात, एक समान उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवूनच समूह पर्यटन केले जाते.

7.विविध जाती-धर्माच्या लोकांनी एकत्र येऊन प्रवास केल्याने एकमेकांच्या चालीरीती समजण्यास मदत होते. त्यामुळे धार्मिक प्रखरता कमी होण्यास मदत होते.

8.इतर कोणत्याही पर्यटनापेक्षा सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून समूह पर्यटन हे नेहमीच उत्तम असते.

9.समूहाने किंवा गटाने प्रवास केल्याने विविध सेवा एकत्र उपभोगल्या जातात. एकत्र सेवा घेतल्यामुळे त्या बाजारमूल्यापेक्षा बऱ्याच अंशी स्वस्त मिळतात. उदा., भोजन किंवा निवास एकत्र येऊन ठरविल्यास माफक दरात उपलब्ध होते.

10.समूहाने पर्यटन करणे किफायतशीर असते. कारण अनेक बाबीत एकत्र सेवा उपभोगल्याचा फायदा होत असतो. जसे, भोजन, निवास, वाहतूक इत्यादी.

11.समूहाने पर्यटन करणे लवचीक नसते. पर्यटकास आपल्या मनाप्रमाणे प्रवास करता येत नाही किंवा विशिष्ट सेवा उपभोगता येत नाहीत. समूहामध्ये राहूनच त्यास प्रवास करावा लागतो.

12.एकत्र येऊन अनेक लोक प्रवास करत असल्यामुळे त्याचे नियोजन काटेकोरपणे करणे गरजेचे असते.

13.नियोजनाचा अभाव असल्यास समूह पर्यटनामध्ये बयाण अडचणी निर्माण होतात.

14.समूह पर्यटनात एखादी आपत्ती निर्माण झाल्यास त्यामधून बाहेर पडणे कठीण होते. उदा., प्रवासाच्या संदर्भात एखादे विमान हवामानाच्या अडचणीमुळे रद्द झाल्यास दूरच्या अंतरावर प्रवास करणे म्हणजेच दुसरे विमान उपलब्ध होणे हे जिकिरीचे असते. एखादा पर्यटक आजारी पडल्यास सर्व पर्यटकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो, भौतिक, शारीरिक किंवा नैसर्गिक कोणत्याही प्रकारची अडचणी निर्माण झाल्यास संपूर्ण पर्यटनाचा बोजवारा उडतो.

**कौटुंबिक पर्यटन :**

कौटुंबिक पर्यटन हा एक पर्यटनाचा महत्त्वाचा प्रकार आहे. पर्यटन करत असताना सहसा व्यक्ती एकटा प्रवास करत नाही. अलीकडील काळात बदललेल्या जीवनशैलीमुळे आठवड्याच्या शेवटी किंवा जोडून सुट्टी आल्यास शहरी भागातील लोक आपल्या कुटुंबासोबत पर्यटन करताना दिसतात. पूर्वीपासूनच आपल्या कुटुंबासोबत पर्यटन करण्यास प्रघात असल्याचे दिसते. भारतात धार्मिक पर्यटन करणाऱ्या पर्यटकांची संख्या मुबलक आहे. किमान वर्षातून एकदा संपूर्ण कुटुंबासमवेत कुलदैवताच्या दर्शनाला जाणाऱ्या लोकांची संख्या प्रचंड आहे. त्यामुळे कुटुंब पर्यटन घडून येत असल्याचे दिसते. महाराष्ट्रातील सर्व भागात लग्नकार्य होत असताना संपूर्ण कुटुंब-नातेवाईक यांच्यासह पर्यटन होत असते.

व्याख्या :

“आपल्या कुटुंबासह करमणूक व आनंद मिळविण्यासाठी केला गेलेला प्रवास म्हणजेच कुटुंब पर्यटन होय.”

“कुटुंबातील व्यक्ती, नातेवाईक, आप्तेष्ट यांच्यासह करमणुकीसाठी केला गेलेला प्रवास म्हणजेच कुटुंब पर्यटन होय.”

**कुटुंब पर्यटनाची वैशिष्ट्ये :**

1.कुटुंब पर्यटन हे आपल्या जवळच्या नातेवाईक आणि घरामधील व्यक्तींसोबत ( केले जाते.

2.कुटुंब पर्यटनाला जाताना बऱ्याचदा धार्मिक स्थळांना भेटी दिल्या जातात.

3.शहरी भागातील लोक आठवड्याच्या शेवटी किंवा जोडून सुट्टी आल्यास कुटुंब पर्यटनासाठी जातात.

4.कुटुंब पर्यटनामध्ये हे नजीकच्या पर्यटन स्थळांना भेटी दिल्या जातात. दूरच्या अंतरावर कुटुंब पर्यटन कमी प्रमाणात केले जाते.

**पर्यटन संकल्पना**

प्रास्ताविक

पर्यटनाच्या वेगवेगळ्या संकल्पना आधुनिक काळानुसार आकारास येत आहेत. काही जणांना दूरच्या देशात, काहींना समुद्रकिनारी तर काहींना तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेऊन धार्मिक पर्यटनाची हौस असते. पर्यटन करणाऱ्या मंडळींच्या आकडेवारीचा ठोकताळा मांडल्यास ग्रामीण भागापेक्षा शहरी भागातील नागरिक पर्यटनासाठी अधिक प्रमाणात बाहेर पडतात. शहरी भागातील मानसिक आणि शारीरिक थकवा आणणाऱ्या जीवनपद्धतीतून वेळ काढून महिन्यातून दोन-तीन दिवस जरी आपल्या आवडीनुसार पर्यटन करत असतात पर्यटनासाठी त्यांना शहराबाहेर जावे लागते.

आधुनिक काळामध्ये कित्येक देशांमध्ये पर्यटनाच्या पारंपरिक संकल्पना मोठीस निधून आरोग्य पर्यटन, कृषी पर्यटन, धाडसी पर्यटन, मेडिकल पर्यटन, वारसा पर्यटन अशा नवनवीन संकल्पना विकसित होत आहेत.

शांत, निवांत आणि ग्रामीण जीवन जवळून पाहण्याची आवड असलेल्यांसाठी 'कृषी पर्यटन' हा प्रकार आता चांगलाच रुजला आहे. कृषी पर्यटन म्हणजे शेतावरील सहर, फेरफटका. आजच्या धकाधकीच्या व कृत्रिम जीवनशैलीने उबग आलेल्या शहरी लोकांनी चार दिवस एखाद्या शेतकऱ्याच्या घरी जाऊन राहायचे, त्या शेतकऱ्याने पर्यटनासाठी आलेल्या शहरी लोकांना सशुल्क पाहुणचार करायचा, अशी ही संकल्पना यामध्ये अभिप्रेत आहे.

**कृषी पर्यटन (AGRO TOURISM)**

कृषी पर्यटनाचा उगम जगात सुमारे साठ ते सत्तर वर्षांपूर्वी व्यावसायिक पातळीवर सर्वप्रथम ऑस्ट्रेलियात झाल्याचे मानले जाते. प्रारंभिक अवस्थेत इटलीमध्ये प्रत्यक्ष शेतावर जाऊन राहणे आणि शेतमाल विकत घेणे म्हणजे कृषी पर्यटन होय; अमेरिकेमध्ये फळे विकत घेणे, घोडे सवारी करणे, स्थानिक प्रदेशातील विविध कलाकुसरीच्या व हस्तकलेच्या वस्तू विकत घेणे म्हणजे कृषी पर्यटन होय इतकाच मर्यादित अर्थ होता.

ऑस्ट्रेलियासह ब्राझील, न्यूझीलंड, कॅनडा, इटली या देशांमध्येही कृषी पर्यटन पूर्वीपासून लोकप्रिय होते. युरोपीय देशांनी तर कृषी पर्यटनाला चालना देऊन त्याला शेतीपूरक व्यवसाय म्हणून मान्यता दिलेली आहे. जागतिकीकरणामुळे कृषी पर्यटनाचा विस्तार जगभरात होऊ लागला आहे.

भारतात कृषी पर्यटनाची सुरुवात करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.

महाराष्ट्रात सर्वप्रथम बारामतीतील प्रगतशील शेतकरी स्व. आप्पासाहेब पवार हे आपल्या शेतावर नावीन्यपूर्ण कृषी संशोधन प्रयोग दाखविण्यासाठी इतर शेतकऱ्यांना बोलावत असत. कृषी संशोधन पाहण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांची ते त्या ठिकाणी निशुल्क राहण्याची व जेवण्याची सोय करत होते.

कालांतराने शुल्क आकारून पुढे 'ॲग्रो-इको टुरिझम' (AET) या नवीन संकल्पनेने कृषी पर्यटन केंद्र नावारूपास आले आहे.

कृषी पर्यटन विकासामध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये प्रचंड वाव आहे. महाराष्ट्राला लाभलेल्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीमुळे महाराष्ट्रातील प्रत्येक खेड्यामध्ये पर्यटन विकासाची गुणवत्ता आहे.

कृषी पर्यटन व्याख्या :

"कृषी संस्कृतीची माहिती करून घेण्यासाठी केला गेलेला प्रवास महणाले कृषी पर्यटन होय."

"शेतावर जाऊन प्रत्यक्ष राहणे, शेतीची कला जाणून घेणे, शेतमाल व त्यासंबंधीची विविध प्रक्रिया जाणून घेण्याकरिता केला गेलेला प्रवास म्हणजे कृषी पर्यटन होय." *

कृषी पर्यटनाची आवश्यकता-

शहरामध्ये हवा व ध्वनी प्रदूषण, गर्दी, धावपळ या बाबींमुळे शहरी लोकांचे स्वास्थ्य बिघडले असून त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. स्वाभाविकपणे निसर्गापासून ३ नैसर्गिक वातावरणापासून दूर गेल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्या कमी होणे शक्य नसले तरी ठरावीक काळासाठी हवापालट केल्याने मानसिक उत्साह निमाण होतो, यासाठी देशाटन केले जाते. पर्यटनासाठी इतर पर्याय उपलब्ध आहेत. परंतु सर्वोत्तम पर्याय कृषी पर्यटन आहे.

ग्रामीण विकासासाठी पर्यटन आवश्यक आहे. शेतकरी जेव्हा रात्रंदिवस घाम गाळून काम करून जेव्हा हाती येणाऱ्या पिकाला योग्य भाव मिळत नाही तेव्हा त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येते. कधी लहरी निसर्गाचा फटका बसून येणाऱ्या पिकांवर बघता-बघता त्याला पाणी सोडावे लागते, त्यामुळेच शेतकऱ्यांना आता कृषीपूरक व्यवसाय गरजेचा झाला आहे. शेतीव्यवसायाला कृषी पर्यटनासारख्या जोडव्यवसायाची साथ मिळून शेतकऱ्यांच्या उत्पादनात भर पडू शकते. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये आर्थिक विकासाला वाव मिळणे शक्य आहे.

कृषी पर्यटनासमोरील आव्हाने-

कृषी पर्यटन हा ग्रामीण भागात विकसित होणारा व्यवसाय आहे. ग्रामीण भागातील लोकांची साक्षरतेची पातळी, विविध तांत्रिक बाबींविषयी असलेले अपुरे ज्ञान, कृषी पर्यटनाकडे ग्रामीण समाजाचा दृष्टिकोन यामुळे कृषी पर्यटनासमोर अनेक आव्हाने आहेत. 1. विपणन (मार्केटिंग) विपणन हा कोणत्याही व्यवसायातील वाढीसाठी महत्त्वाचा घटक ठरत आहे. प्रत्यक्ष ग्राहकांपर्यंत माहिती उपलब्ध झाल्यामुळे उत्पादकांना त्याचा फायदा होतो. शेतकऱ्यांसमोर सर्वांत मोठे आव्हान म्हणजे कृषी पर्यटन केंद्राकडे पर्यटकांचा ओघ वाढविणे होय, आजमितीस महाराष्ट्रात चारशेहून अधिक मान्यताप्राप्त कृषी पर्यटन केंद्रे आहेत. तसेच मान्यता नसलेली अनेक कृषी पर्यटन केंद्रे आहेत. या सर्व कृषी पर्यटन केंद्राची माहिती बऱ्याचदा पर्यटकांना नसते. शेतकरी आपल्या कृषी पर्यटन केंद्राची माहिती सर्व थरातील

पर्यटकांपर्यंत पोहोचविण्यास कमी पडतात. त्यामुळे कृषी पर्यटन केंद्राचे मार्केटिंग होणे आणि अधिकाधिक पर्यटक या केंद्राकडे आकर्षिले जाणे गरजेचे आहे.

भांडवल नवीन कृषी पर्यटन केंद्र सुरू करत असताना मोठ्या प्रमाण भांडवलाची आवश्यकता असते. कृषी पर्यटन केंद्रावर पर्यटकांना निवास, आहार इतर सुविधा निर्माण करून देत असताना मोठे भांडवल आवश्यक असते. शेतकय पर्यटनासाठी आवश्यक असलेल्या सर्व मूलभूत बाबी उपलब्ध असल्या कृषी सुर्वेच्या निर्माण करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता अस्ते. ते भांडवल उपल होऊ न शकणे सर्वांत मोठे आव्हान ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसमोर असते,

1.शासकीय धोरणे : कोणत्याही प्रकारच्या व्यवसायासाठी शासकीय घोट अनुकूल असतील तर त्या व्यवसायाचा विकास जलद गतीने होतो, पर्यटन हा व्यवस अदृश्य स्वरूपाचा असल्यामुळे अनेक घटकांच्या एकत्रीकरणातून तो साकारला जाने पर्यटनाला व्यवसायाचा दर्जा मिळणे आवश्यक आहे. इतर व्यवसायासाठी ज्याप्रमाणं विविध प्रकारच्या तरतुदी केल्या जातात तशा तरतुदी कृषी पर्यटन व्यवसायाला मिळवून आवश्यक आहे. उदा., वीज बिलामध्ये सवलत, कमी व्याजदरामध्ये भांडवलाची उपलब्धत भांडवली अनुदाने इत्यादी. इतर व्यवसायाप्रमाणे कृषी पर्यटनाला सवलतीची घोरा शासकीय पातळीवर घेण्यात आली तर कृषी पर्यटनाला नवसंजीवनी प्राप्त होईल.

2.प्रशिक्षणाचा अभाव : कोणत्याही व्यवसायामध्ये प्रशिक्षित कामगार असतील तर त्या व्यवसायाची भरभराट जलद गतीने होते. पर्यटन या व्यवसायाला व्यावसायिक दर्जे प्राप्त झाल्यानंतर प्रशिक्षित कामगारवर्गाची गरज असते. ग्रामीण भागातील शेतकरी । व्यावसायिक ज्ञानाच्या बाबतीत अनभिज्ञ असल्यामुळे व्यवसायाचा प्रसार करण्यामध् अडचणी निर्माण होतात. कृषी पर्यटन केंद्र चालविणाऱ्या शेतकऱ्यांना शासकीय पातळ्यांक प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. आज इतर पर्यटनाशी संबंधित व्यवसायामध्ये - उदा., हॉटेल व्यवसायाकरिता 'हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट' सारखे कोर्सम उपलब्ध आहेत. त्या प्रकारचा 'ॲग्रो टुरिझम मॅनेजमेंट' सारखे कोर्स उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिल्यास कृषी पर्यटनाची ग्रामीण भागामध्ये निश्चित भरभराट होऊ शकते.

3.संघटनात्मक अभाव : व्यवसायाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला असे निदर्शनास येते की, प्रत्येक व्यवसायाच्या तालुकापातळीपासून देशपातळीपर्यंत वेगवेगळ्या प्रकारच्या संघटना अस्तित्वात आहेत. या संघटनांमार्फत व्यवसायाचे मार्केटिंग करणे, जाहिरात करणे, व्यवसायाला प्रतिष्ठा मिळवून देणे यांसारख्या बाबी केल्या जातात. कृषी पर्यटन क्षेत्रामध्ये अशा प्रकारच्या संघटनाचा अभाव असल्यामुळे कृषी पर्यटनाच्या विकासामध्ये अडथळा निर्माण होतो. ज्या सुविधा उपलब्ध आहेत त्या देखील अतिशय अल्प प्रमाणात आहेत. समाजातील सर्व घटकांपर्यंत कृषी पर्यटनसंदर्भात माहिती पोहोचत नाही. शासकीय पातळीवर या व्यवसायाच्या संदर्भात करावयाच्या नियोजनाच्या संदर्भात कार्यवाही होत नाही. त्यामुळे कृषी पर्यटन क्षेत्रामध्येदेखील व्यावसायिक किंवा सहकारी संस्था विकसित होणे गरजेचे आहे.

4.सामूहिक कार्याचा अभाव : कृषी पर्यटनाच्या अनुषंगाने पर्यटकांना अनेक बाबी असते. • या सर्व बाबी एकाच शेतकऱ्याकडे उपलब्ध असतील असे नाही. कृषी पर्यटन केंद्र विकसित केल्यानंतर या केंद्रांना भेट देणाऱ्या पर्यटकांना ग्रामीण संस्कृतीची पुरविणे आवश्यक माहिती करून देत असताना फलोद्यान, गोपालन, कुक्कुटपालन, शिवार फेरी अशा बच्ची माहिती पर्यटकांना देण्यासाठी 'कृषी पर्यटन केंद्रे' सक्षम नसतात. त्यामुळे वाचविध कवी पर्यटन केंद्रावर फक्त खाणे-पिणे आणि राहणे एवढेच होते. जर ग्रामीण भागातल अनेक संस्था व शेतकरी एकत्र येऊन या सगळ्या सुविधा पर्यटकांना देऊ शकले तर अज्ञा सर्व सुविधांनी युक्त असलेल्या पर्यटन केंद्रांना भेटी देण्याचे प्रमाण निश्चित वाढेल. त्यामुळे कामीण भागांमध्ये कृषी पर्यटन केंद्रे विकसित करत असताना जबाबदाऱ्यांचे वाटप करून घेऊन सामूहिक रीतीने त्याचा विकास केला जाणे आवश्यक आहे.

5.कृषी पर्यटन परवान्याचा अडथळा : कृषी पर्यटनाच्या परवान्याअभावी कृषी पर्यटन केंद्रावर पर्यटकांना दिले जाणारे जेवण आणि उत्पादनाच्या विक्रीबाबत अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे शेतकऱ्यांचा जोडव्यवसाय असे स्वरूप ठेवून, पडताळणीनंतर किमान दहा वर्षांपर्यंत कृषी पर्यटनाचा परवाना दिला जाणे आवश्यक आहे. परवाने मिळण्यात येणाऱ्या अडचणी कमी होणे गरजेचे आहे. तसेच कृषी पर्यटन परवाने देत असताना शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणेही गरजेचे आहे.

कृषी पर्यटनाचे फायदे-

ग्रामीण भागात फक्त शेतीवरच अवलंबून असणाऱ्या उपक्रमशील शेतकऱ्यांना वर्षांतून इन ते तीन वेळा उत्पादन मिळते. दोन ते तीन महिन्यातून एकदा त्यांच्या हाती पैसा बैतूल मात्र खर्च रोजचाच असतो. अशा परिस्थितीत शेतीचा उपयोग रोज उत्पादन मिळवून समाप्या व्यवसायात करता येईल का ? या विचारातूनच 'कृषी पर्यटन' या शेतीपूरक अबसायाची संकल्पना पुढे येणे गरजेचे आहे. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागात वाढलेली दरी भरून काढता येणे शक्य आहे. याशिवाय शेतीतून उत्पादित झालेला सेंद्रिय शेतमाल जागेवरच प्रत्यक्ष पर्यटकांना विकून उत्पन्न मिळविणे सहज शक्य आहे. कमी भांडवली खर्चात कृषी पर्यटन हा शेतीपूरक व्यवसाय सुरू करता येतो.

या व्यवसायाचा प्रमुख उद्देश म्हणजे पर्यटकांना ग्रामीण जीवनाची ओळख करून देणे आणि शहरातील पैसा ग्रामीण भागाकडे वळविणे हा आहे. या व्यवसायातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणे शक्य आहे. कृषी पर्यटनाकडे जर आपण एक व्यावसायिक म्हणून पाहिले तर आपल्याला शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा कितीतरी पटीने जास्त उत्पन्न या व्यवसायातून मिळू शकते.

**कृषी पर्यटनामुळे पुढील बाबी होणे शक्य आहे** :

1.शेतीच्या पुनरुज्जीवनासाठी व वाढीसाठी कृषी व ग्रामीण पर्यटनाची गरज आहे.

2.गावातील सण, उत्सव, परंपरा यांची माहिती पर्यटकांना देऊन ग्रामीण संस्कृती, पर्यावरणाचे संवर्धन करण्याचे काम होऊ शकते.

3.ग्रामीण व स्थानिक रोजगारामध्ये वृद्धी होऊन बेरोजगार, कुशल व अकुशल श्रमिकांना स्थानिक परिसरामध्येच काम व मोबदला मिळेल.

4.शेतकरी व गावाच्या सर्वांगीण विकासासोबत लोकांचा अभिमान वाढेल आणि स्थानिक वारसा, इतिहास, चालीरीती इत्यादींबद्दल सर्वांना माहिती होईल.

5.लघुउद्योग, कुटीरोद्योग, हस्तकलेचे उद्योग या उद्योगांना चालना मिळेल.

6.गावातील सोईसुविधांच्या गुणवत्तेमध्ये वाढ होईल.

7.कृषी पर्यटनामुळे शेतात पिकविल्या जाणाऱ्या शेतमालाला स्थानिक बाजारपेठ उपलब्ध होईल.

8.कृषी पर्यटन केंद्र शेतातील जागेतच असल्यामुळे या केंद्रामार्फत कृषिमाल प्रत्यक्ष ग्राहकांच्या हाती देता येईल.

9.सेंद्रिय पद्धतीने पिकविलेला भाजीपाला, फळे, अन्नधान्य ग्राहकांना मिळण्याचे ठिकाण उपलब्ध होईल.

10.गावातील महिला बचत गटामार्फत तयार केलेल्या मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठा उपलब्ध होतील.

11.शहरी पर्यटकांमुळे ग्रामीण भागातील लोकांना आधुनिकतेशी ओळख होण्यास मदत होईल.

12.गावाला प्रसिद्धी मिळणे शक्य होईल. तसेच संस्कृती व पर्यावरण संवर्धनास मदत होईल.

13.शेती, ग्रामीण जीवन आणि पर्यटन यांचा समन्वय म्हणजे कृषी पर्यटन होय.

14.शाश्वत पर्यटनात अग्रस्थानी आणि पर्यटन रोजगारवाढीस बळकटी देणारा कृषी पर्यटन हा पर्यटनाचा एक प्रकार आहे. 16 मे हा दिवस 'जागतिक कृषी पर्यटन दिन' म्हणून साजरा केला जातो.

महाराष्ट्रामध्ये पर्यटन व्यवसायाला नवसंजीवनी मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने (MTDC) सन 2016 च्या पर्यटन धोरणामध्ये कृषी पर्यटनाचा साकल्याने विचार केलेला आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पर्यटन विकास महामंडळाचे सहकार्य तसेच महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण पर्यटन सहकारी महासंघ मर्यादित (MART) यांसह राज्याच्या वेगवेगळ्या भागात स्थापन झालेल्या संस्थांकडून कृषी पर्यटनाला चालना देण्यात येत आहे. ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी कृषी पर्यटन विकसित होणे अत्यंत आवश्यक आहे.

**पर्यावरणीय पर्यटन (इको टुरिझम)**

**(ECO TOURISM)**

निसर्गाचे संवर्धन करून पर्यटन करणे हा दृष्टिकोन विकसित होऊ लागला आहे, यालाच 'इको टुरिझम' असे म्हणता येईल. इको टुरिझमला 'निसर्ग पर्यटन' तसेच 'पर्यावरणीय पर्यटन' असेही म्हणतात.

Ecology या इंग्रजीतील शब्दांना 'पारिस्थितिकी विज्ञान' किंवा 'पर्यावरण' असेही म्हणतात. यामधील 'Eco' हा शब्द पर्यावरण दर्शवितो. सद्यःस्थितीत अनेक उत्पादनावर 'Eco Friendly Product' असे लिहिलेले असते. याचा अर्थ, त्या उत्पादनामुळे किंवा वस्तूमुळे पर्यावरणाची कोणत्याही प्रकारची हानी होत नाही. या ठिकाणी उपयोगात आणला गेलेला हा शब्द पर्यटनाच्या संदर्भातही उपयोगात आणला गेला आहे.

इको टुरिझम म्हणजे फक्त निसर्गाच्या सान्निध्यात पर्यटन करणे असे नथे, तर से पर्यटन केले जात असताना पर्यावरणाची कोणत्याही प्रकारे हानी देणे असा अर्थ अभिप्रेत आहे. होणार नाही याची काळजी

मानवाने आपल्या हव्यासापोटी सृष्टिसौंदर्याची अपरिमित हानी केलेली आहे, त्यातूनही नाई पर्यटनासाठी तो जेव्हा विविध निसर्गसान्निध्य लाभलेल्या ठिकाणांना अहो त्यातूनही कार पर्यावरणाची प्रचंड नासधूस करतो. यामुळे पर्यटन स्थळांचे विद्वपकरण झाल्याशिवाय रोजान नाही. निसर्गामधील अनेक घटकांचा आस्वाद घेताना मानवाकडून अतिरेक होत निसर्गाची ही सर्व रूपे पर्यटकांसाठी तर आकर्षणाचा बिंदू आहेतच; पण त्याही पुडे जाऊन त्या ठिकाणच्या स्थानिक जैवविविधतेसाठी अधिवास म्हणून त्यांचे महत्व खूपच जास्त आहे. अनेक प्राणी, पक्षी, छोटे कीटक, सरीसृप, अन्नसाखळीतील छोटे-मोठे घटक यांचे जीवन या अधिवासावर अवलंबून आहे. निसर्गामध्ये संतुलन कायम राखण्यामध्ये या घटकांचा वाटा फार मोठा आहे. त्यामुळेच पर्यटनाचा आनंद घेतानाच या अधिवासाची म्हणजेच तेथील पर्यावरणाची काळजी घेणेही तेवढेच अत्यावश्यक आहे. पण सद्यःपरिस्थितीत चालू असलेल्या पर्यटनावर एक नजर फिरविली तर या अधिवासाची व पर्यायाने तेथील न पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होताना दिसून येत आहे.

अनियंत्रित पर्यटन व योग्य नियोजनाच्या अभावामुळे एकेकाळी सौंदर्यपूर्ण व निसर्गसंपन्न असलेली ही पर्यटनस्थळे आता बकाल होऊ लागली आहेत. परिणामतः या ठिकाणी अस्वच्छता, वृक्षतोड, वाढती गर्दी, पर्यटन स्थळांची नासधूस, नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास अशा अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, यांत्रिकीकरण व आधुनिकीकरणाच्या वेगात हे प्रमाण जास्तच वाढले आहे. या सगळ्याला वेळीच आवर घातला नाही तर निसर्गाचा हा सगळा अनमोल ठेवाच नाहीसा होण्याची शक्यता आहे.

पर्यटनाच्या प्रगतीबरोबरच स्थानिक पर्यावरणाची काळजी घेणेही तेवढेच गरजेचे आहे. यासाठी अनियंत्रित व बकाल पर्यटनाऐवजी सुनियोजित व शाश्वत अशी 'निसर्ग पर्यटन' किंवा 'इको टुरिझम' ही संकल्पना राबविणे अत्यावश्यक बनले आहे.

'निसर्गाची हानी न होता केले जाणारे पर्यटन' म्हणजे 'इको टुरिझम' (निसर्ग पर्यटन) होय, अशी 'इको टुरिझमची' साधी व सोपी व्याख्या आपल्याला करता येईल.

पर्यटनाच्या माध्यमातून पर्यावरणाचे संरक्षण, नैसर्गिक साधनसंपत्तीचा सुज्ञ व कमीतकमी वापर आणि स्थानिक लोकांचा आर्थिक-सामाजिक विकास ही निसर्ग पर्यटनाची मुख्य उद्दिष्टे होत. निसर्गाची धारणक्षमता ओळखून, स्थानिकांच्या शाश्वत विकासासाठी आणि पर्यटकांच्या आनंदासाठी निसर्ग

पर्यटन राबविणे गरजेचे असून पर्यटक, व्यावसायिक व स्थानिक लोक या सर्वांची यात महत्वाची भूमिका असते.

पर्यटन संकल्पना - I

CONCEPT OF TOURISM - II

**आरोग्य/मेडिकल पर्यटन**

**(HEALTH/MEDICAL TOURISM)**

आरोग्य पर्यटनास मेडिकल टुरिझम, चिकित्सा पर्यटन, स्वास्थ्य पर्यटन आणि आरोग्य पर्यटन अशा विविध नावांनी संबोधले जाते. बदलत्या जीवनशैलीमुळे मानवी जीवनात अनेक प्रकारच्या शारीरिक व्याधी निर्माण झालेल्या आहेत. प्राचीन काळी आरोग्यसंपन्न राहावे म्हणून दूरच्या देशात प्रवास करणारे अनेक होते. हिंदू धर्म आचरणप्रणालीमधील 'वानप्रस्थाश्रम' म्हणजेच संपूर्ण जीवनाचा विविध पातळ्यांवर आस्वाद घेतल्यानंतर उतारवयामध्ये निरोगी व आरोग्यसंपन्न जीवन जगण्यासाठी निसर्गाच्या सान्निध्यात केलेला प्रवासच असायचा. आजच्या काळात या संकल्पना मोडकळीस आल्या असल्या तरी सेवानिवृत्तीनंतरच्या काळात अनेक लोक आपल्या कुटुंबासोबत विविध पर्यटन स्थळांना भेटी देत असल्याचे दिसून येते. या प्रकारच्या अनेक क्रियांमधून आरोग्य पर्यटनासारखी संकल्पना विकसित झाल्याचे दिसून येते.

मानवाला होणाऱ्या बऱ्याचशा व्याधी या मनोविकाराशी संबंधित असतात. अशा रोग्यांना वैद्य हवापालट करण्यासंदर्भात सल्ला देतात. या पसंबंधित असतात आपण राहत असलेल्या निवासस्थानापासून दूरच्या प्रदेशात जेथे करमणूक आणि विरंगुळा मिळू शकतो अशा ठिकाणी जाऊन राहणे होय. त्यामुळे आर्थिक सुबत्ता असलेले लोक थंड हवेची ठिकाणे, विविध आरोग्यधाम, निसर्गसान्निध्य लाभलेल्या ठिकाणी जाऊन राहणे पसंत करतात.

भारतातील केरळमध्ये आयुर्वेदिक उपचार पद्धती जगप्रसिद्ध आहे. केरळमधील पंचकर्म ही आयुर्वेदिक उपचार पद्धती करून घेण्यासाठी जगातील अनेक पर्यटक तेथे भेटी देतात. आरोग्य पर्यटनामुळे आरोग्यधामाची विविध ठिकाणे विकसित झाल्याचे दिसून येते. या आरोग्यधामाच्या ठिकाणी कमीतकमी शुल्कामध्ये रोग्यांना उत्तम प्रकारच्या सुविधा दिल्या जातात. या उपचार पद्धतीमुळे इतर कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. तसेच रोग्याचे शारीरिक व मानसिक आरोग्य विकसित होण्यास मदत होते.

महाराष्ट्रातील लोणावळा येथील कैवल्यधाम योग अभ्यास केंद्र, स्व. बालाजी तांबे यांचे कुर्ला येथील आत्मसंतुलन व्हिलेज तसेच लोणी काळभोर येथील आयुर्वेदिक उपचार केंद्रे प्रसिद्ध आहेत.

अलीकडील काळात मेडिकल टुरिझम म्हणजेच आरोग्य पर्यटनाला व्यापक अर्थ प्राप्त झालेला आहे. विविध प्रकारच्या आजारांच्या बाबतीत विविध देशांमध्ये केले जाणारे उपचार व त्याकरिता येणारा खर्च,

त्या संबंधीचे असणारे नियम भिन्न-भिन्न स्वरूपाचे आहेत. अमेरिकेमध्ये लिव्हरच्या संदर्भात केल्या जाणाऱ्या सर्जरीचा खर्च तीन लाख अमेरिकन डॉलर्स एवढा असून तीच सर्जरी जर कॅनडामध्ये केली तर सत्तर हजार डॉलरमध्ये खर्च होतो.

दंतचिकित्सा करण्यासाठी पाश्चात्य देशात येणाऱ्या खर्चाच्या पाच टक्के खर्च भारतात येतो. काही उपचार पद्धती करण्यासाठी काही देशांमध्ये अटकाव असतो. उदा., कॉस्मेटिक सर्जरी. या सर्जरी दुसऱ्या देशात सहज करता येणे शक्य असते. या प्रकारच्या उपचार पद्धती घेण्यासाठी लोक एका देशातून दुसऱ्या देशात प्रवास करतात. यामुळे पैशाचीही बचत होते आणि पर्यटनही घडून येते.

भारतात या प्रकारच्या सेवा घेण्यासाठी येतात. या प्रकारच्या आरोग्यसेवा घेण्यासाठी त्याच्या सरकारकडून त्यांना विशेष सवलती आणि सुट्ट्याही मंजूर होतात. म्हणजे स्वतःच्या देशामध्ये फक्त आरोग्यसेवेसाठी लागणाऱ्या खर्चामध्ये दुसऱ्या देशात जाऊन आरोग्यसेवेबरोबर विविध ठिकाणांना भेटी देणे शक्य होते. त्यामुळे मेडिकल टुरिझम ही संकल्पना अधिक व्यापक झाल्याचे दिसते.

**क्रीडा पर्यटन (SPORTS TOURISM)**

मनोरंजन वा शारीरिक व्यायाम यासाठी केली जाणारी कोणतीही क्रीडा खेळण्याची प्रवृत्ती ही माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. लहान बालकापासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच खेळांची आवड असते. अगदी प्राथमिक अवस्थेतील मानवसमाजातही अनेक प्रकारचे खेळ खेळले जात. शिकार, कुस्ती, द्वंद्वे, कवड्या, सोंगट्या, फासे इत्यादी खेळ ते खेळत, • प्राचीन ग्रीक लोक अनेक प्रकारचे खेळ खेळतात. खेळांना नियमित व सुसंघटित असे स्वरूप ग्रीक लोकांनीच दिले. त्यांच्या जीवनात खेळांना फार महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. ग्रीक लोकांच्या वैभवकालात त्यांचे ऑलिम्पिक, नेमियन, पायथियन, इस्थमियन इत्यादी नियतकालिक सामने प्रसिद्ध होते. या सामन्यात भाग घेणे व विजय मिळविणे हे मानाचे समजले जाई. या सामन्यात धावणे, थाळीफेक, रथांच्या व घोड्यांच्या शर्यती, कुस्ती, मुष्टियुद्ध इत्यादी खेळांचा समावेश असे. रोमन लोकांमध्येही खेळांना प्राधान्य होते.

आपल्या भारतात प्राचीन वैदिक काळात तसेच रामायण व महाभारत काळात श्रुत, काले, कुस्ती, रथांच्या व घोड्यांच्या शर्यती इत्यावी खेळ प्रचलित भारत काळात थल इजिप्त, चीन, जपान या देशातही सोंगट्या, गंजीफा, बुद्धिबळ, शतरंज यांसारखे माणे फार पुरातन काळापासून रूढ होते.

खेळांना मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. जीवनातील व्यथा व चिंता विसरावयास लावून मनाला विरंगुळा देण्याचे तसेच शरीर व मन ताजेतवाने करण्याचे विविध खेळ करू शकतात. शारीरिक श्रमाच्या खेळात शरीरास भरपूर व्यायाम मिळतो आणि त्यामुळे शरीर काटक व बळकट बनते. खेळांमुळे मनोधैर्य, चिकाटी, खिलाडू वृत्ती इत्यादी गुणांचीही बाढ होते. सांघिक खेळामुळे सहकार्याची वृत्ती, संघभावना व नेतृत्व गुण यांना वाव मिळतो आणि या गुणांचा जीवनात विविध प्रसंगी उपयोग होतो. खेळातील चढाओढीमुळे खेळांचा इर्जाही वाढतो. राष्ट्रा-राष्ट्रातील क्रीडा स्पर्धांमुळे आंतरराष्ट्रीय सामंजस्यही वाढीस लागते.

खेळांचे निरनिराळ्या दृष्टिकोनातून अनेक प्रकार पडतात. खेळांची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन सामान्यतः त्यांचे बैठे खेळ व मैदानी खेळ असे दोन प्रमुख प्रकार पडतात.

बैठे खेळ म्हणजे घरात बसून खेळले जाणारे खेळ. उदा., पत्त्यांचे खेळ, बुद्धिबळ, गंजीफा, सोंगट्या, फाशांचे खेळ, कॅरमं इत्यादी.

मैदानी खेळातही छोटे मैदानी खेळ व मोठे मैदानी खेळ असे दोन प्रकार पडतात. छोट्या मैदानी खेळांना (कोर्ट गेम्स) छोटी बंदिस्त जागा व आखलेली क्रीडांगणे लागतात. या प्रकारात बॅडमिंटन, टेबल टेनिस, रिंग टेनिस, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल यांसारखे विदेशी खेळ येतात तर खोखो, कबड्डी, आट्यापाट्या, लंगडी हे देशी खेळ येतात. दुसऱ्या प्रकारच्या मैदानी खेळांना मोठी मैदाने लागतात. त्यात क्रिकेट, फुटबॉल, हॉकी, पोलो, बेसबॉल, गोल्फ इत्यादी विदेशी खेळ मोडतात.

याशिवाय क्षेत्रीय शर्यतीचे खेळ असतात. त्यात धावण्याचे, मॅरेथॉन शर्यती, फेकणे (गोळाफेक, थाळीफेक), उड्या (लांब उडी, उंच उडी) हे सर्व प्रकार आणि या सर्व प्रकारच्या अडथळ्यांच्या शर्यती (हर्डल्स) यांचा समावेश होतो.

पोहणे व पाण्यातील खेळ या गटात विविध प्रकारांनी व विविध अंतरे पोहून जाण्याच्या शर्यती, वॉटरपोलो (पाण्यातील फुटबॉल), उंचीवरून पाण्यात निरनिराळ्या प्रकारच्या उड्या आणि सूर मारणे इत्यादींचा अंतर्भाव होतो.

द्वंद्वात्मक खेळात वेगवेगळ्या प्रकारच्या कुस्त्या, मुष्टियुद्ध यांची गणना होते. शारीरिक कसरतीच्या खेळात मल्लखांब, आडवा दंड, जोड दंड, उड्यांचे घोडे, टांगत्या कड्या यांसारख्या साधनांच्या आधारे करावयाच्या विविध शारीरिक कसरती व जमिनीवर करावयाच्या उलट्यासुलट्या कोलांट-उड्या, हात-पाय चक्र (कार्टव्हील) यांसारख्या कसरती येतात.